'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143 (Online)
Vol. 1 Issue. 2 | April-June-2014

# भारतीय स्त्रियांचे कुटुंबातील आणि समाजातील स्थान

**प्रा. ज्योती आधार चौधरी**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**शिरपूर जि. धुळे, [महाराष्ट्र] भारत**

**प्रास्ताविक :-**

भारतात पुरुष प्रधान संस्कृती आहे त्यामुळे पुरातन काळापासून स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेले आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यात नेहमीच फरक केला गेला आहे. शतकानुशतके स्त्री-पुरुष यांच्यामधील फरकाची व्याख्या सामाजिक पद्धतीने केली गेली आहे. ती लैंगिकतेच्या दृष्टीकोनातून केल्याचे दिसून येते. त्यामुळे ती विकृत पद्धतीने केल्याचे दिसते. ही फरकाची व्याख्या करतांना पुरुष वरचढ ठरवला गेला. दुर्दैवाने हा वरचढपणा कायमच राहिला आहे.

समाज निर्मितीच्या प्रक्रियेत स्त्री-पुरुष यांना महत्वाचे स्थान व मूल्य आहे. पण प्रत्यक्षात समाजव्यवस्थेत त्यांच्या जगण्याच्या संधीत व जीवनाच्या विविध पातळीवर विषमता दिसून येते. परिणामी लिंगाधारीत विषम सामाजिक चौकट तयार झाल्याने त्यातून पुरुषप्रधान संस्कृतीला अधिष्ठान प्राप्त झाले. त्याचा विपरीत परिणाम स्त्रियांच्या सामाजिक, राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनावर होतांना दिसत आहे. परिणामी स्त्रियांच्या वाट्याला सामाजिक व कौटुंबिक व्यवस्थेत दुय्यमत्व प्राप्त झाले. त्यामुळे विकासाच्या संधी नाकारण्यात आल्या त्यामुळे कौटुंबिक विकास एकांगी झाल्याने समाज व देशाचे अपरिमित नुकसान झालेले आहे.

❖ **भारतीय संविधान आणि महिलांचे मानवधिकार** :-

भारत स्वतंत्र झाल्यावर स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने पावले उचललेली गेली. राजकीय, सामाजिक, कला, साहित्य क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढावा म्हणून प्रयत्न होवू लागले. स्त्री-पुरुष समानता, स्त्री - शिक्षण, हक्क व कर्तव्य या बाजुने राज्य घटनेचे विचारचक्र फिरु लागले.

राज्यघटना अर्थात देशाचा सर्वोच्च कायदा जो देशातील सर्वच नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असतो. भारतीय राज्यघटनेत स्त्री - पुरुष यांना समान लेखलेले आहे. भारतीय राज्यघटनेत महिलासंबंधी विशेष तरतुद असणारी विविध कलमे निर्माण करण्यात आली आहे.

१) कलम १४ अन्वये कायद्यापुढे सर्व समान आहेत.
२) कलम १५ अन्वये धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरुन भेदभाव करण्यास मनाई आहे.
३) कलम १६ अन्वये सार्वजनिक सेवा योजनेमध्ये समानसंधी आहे.

४) कलम ३९ (क) उपजिविकेचे साधन मिळविण्याचा स्त्रि पुरुषांना समान अधिकार

५) कलम ३९ (घ) अन्वये समान कामाबद्दल स्त्रि पुरुषांना समान वेतन

६) कलम ४४ समान नागरी कायदा.

स्त्रिया पुढे याव्यात व त्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव होऊन त्यांनी राष्ट्र उभारणीच्या कामास हातभार लावावा या उद्देशाने भारतीय शासनाने अनेक सुधारणा हेतुपूरस्कर केल्या आहेत जसे

१) १८ डिसेंबर १९७९ ला स्त्रियांवर होणारे सर्व प्रकारचे अन्याय दूर करण्यासाठी ठराव स्विकारला गेला.

२) १९७६ मध्ये स्त्रियांसाठी राष्ट्रीय ॲक्शन प्लॅन स्विकारला ज्यामुळे स्त्री विकासाच्या कामाला चांगले मार्गदर्शन मिळाले.

३) पंचायत राजव्यवस्थेत १/३ स्थान स्त्रियांसाठी राखीव ठेवलेले आहे.

४) नोकरीमध्ये महिलांच्या आरक्षणासाठी तरतुद केलेली आहे.

५) भारतीय दंडसंहिता १९६० मध्ये महिलांवरील अपराधासाठी कठोर शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

६) ३१ जानेवारी १९९२ रोजी महिला आयोगाची स्थापना केली गेली.

शासनाच्या या सोयी-सूविधांचा लाभ घेत महिला भरारी घेऊ लागल्या आहेत. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपली छाप पाडली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात महिला समर्थपणे उभ्या आहेत. असे असले तरी स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन समाजाचा व कुटूंबाचा पारंपारिकच आहे. अजुनही कुटूंबात व समाजात बहुसंख्य स्त्रियांना दुय्यम दर्जाच आहे.

❖ **स्त्रियांचे समाजातील स्थान** :-

भारतीय समाजसंदर्भात स्त्रीचा विचार करता असे लक्षात येते की धर्म, रुढी, परंपरा, प्रथा इत्यादीच्या माध्यमातून स्त्रीला एका चौकटीमध्ये बद्ध करण्यात आले आहे. परिणामस्वरुप मुलभूत हक्कांपासून वंचित झालेल्या स्त्री समाजाच्या शोषणाची बळी ठरली.

भारतीय संस्कृतीत 'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' असे एक सुभाषित आहे. याचा अर्थ ज्या समाजात स्त्रियांची पूजा होते तेथे देवता रममाण होतात. परंतु आज ही भारतीय संस्कृती प्रत्यक्षपणे दिसुन येत नाही. उलट स्त्रियांकडे फक्त भोगवादी दृष्टीनेच समाज पाहतो. बलात्काराच्या घटनामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. स्त्री म्हणुन गौण लेखनं, टॉन्टिंग, कार्यक्षमतेबद्दल मत्सर, एकटं पाडंण हे पुरुष कंपूचे वर्तन मानसिक छळ करणारे आहे.

समाजात महिलांना गृहिणी, माता, उत्पादक, कामगार, राज्याची नागरिक या सर्व भुमिका बजावत असतांना वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. अधिकार म्हणून जी कलमे मान्य झालेली आहेत त्यांचा विचार केला असता

असे दिसून येते की प्रत्यक्ष भूमिकेत स्त्रियांची गळचेपी, अधिकाराची पायमल्लीच झालेली दिसुन येते. कामाच्या ठिकाणी दुय्यम स्थान, कामाच्या ठिकाणच्या जाचक अटी, कामाचा अतिरिक्त बोजा यातुन स्त्रीयांचे शोषण होत आहे.

काही अपवाद वगळता साऱ्या संस्कृतीत पुरुषप्रधानता आहे आणि सारी सामाजिक, भावनिक व मानसिक अस्मिता ही स्त्री विषयक बाबीत एकवटली आहे. म्हणजे वैयक्तिक किंवा कौटुंबिक पातळीवर असलेली इभ्रत, इज्जत आणि प्रतिमा या साऱ्या गोष्टी त्या त्या घरच्या स्त्रियांच्या वर्तनाशी निगडीत असतात. समाजात असलेली प्रतिष्ठा ही त्या घरच्या स्त्रियांच्या चारित्र्याशी थेट संबंधित असते. त्यामुळेच बहुतेक संस्कृतीमध्ये स्त्री वर्गाला दडपून ठेवण्याकरीता विविध संकल्पना, रुढी आणि परंपरा जोपासण्याची सामाजिक वृत्ती अनुभवास येते.

कोणा पुरुषाचा तेजोभंग करावयाचा असेल तर त्याच्या रक्ताच्या नात्यातील स्त्रियांचा असभ्य आणि अर्वाच्च भाषेत उल्लेख करणे नित्याचेच आहे. अपमानाची तीव्रता जशी जशी वाढत जाते तशी तशी संबंधित स्त्रियांची मानहानी करण्याची पद्धत आणि तीव्रताही वाढत जाते. स्त्रीला होणारा मानसिक आणि शारीरिक त्रास, माणूस म्हणून असलेल्या तिच्या अस्तित्वासाठी तिला करावा लागणारा संघर्ष ही याच मानसिकतेची परिणती आहे.

स्त्री मुक्ती किंवा स्त्रीला समान हक्क हे विषय आपल्या सर्व साधारण विकास कार्यक्रमात समाविष्ट आहेत. मुलींच्या शिक्षणासाठी शासन सवलती व सहाय्य देत आहे तरी सुद्धा मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण ९४० आहे तर एकुण साक्षरता ७४.०४% आहे. त्यात पुरुषांची साक्षरता ८२.०४% तर स्त्रियांची ६५.४६% आहे. ६०% माता कुपोषित आहेत तर बालविवाहाचे प्रमाण ४०% आहे. दरवर्षी ५००० स्त्रिया कौटुंबिक अत्याचाराच्या बळी होतात. तर ५ वर्षाखालील बालमृत्युचे प्रमाण दरवर्षी २० लाख आहे. दवाखान्याबाहेर जन्माला येणाऱ्या मुलांचे प्रमाण ५८% आहे. तर दारिद्र्याचे प्रमाण ४१.४% आहे. ही आकडेवारी स्त्रियांच्या सामाजिक आरोग्याचे वास्तव दर्शवित आहे.

बहुतांश देशातील स्त्रियांच्या मानाने भारतीय स्त्रिया राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रात अधिक कार्यरत दिसत असल्या तरी वास्तव जीवनात परंपरागत सामाजिक प्रवृत्ती आणि पुरुषार्थाच्या भ्रामक कल्पना यांचे सावट तिच्यावर पडलेले आहे. ग्रामीण स्त्री आज आरोग्य, कुटुंब, रोजगार, बालसंगोपन, आहार, निरक्षरता या समस्यांनी ग्रासली आहे. त्याचप्रमाणे शहरी स्त्रियाही घरकाम, मुलांचे संगोपन आणि नवऱ्याच्या हुकूमाची ताबेदारी सांभाळत आहे.

सर्व मानव हे जन्मत: स्वतंत्र असून प्रत्येकास प्रतिष्ठा व अधिकार असतात. मानवी हक्क हे वंश, लिंग, भाषा, धर्म व राजकिय विचारांच्या निरपेक्ष असतात. स्वत:चे जीवन जगणे, स्वतंत्रता व सुरक्षितता याचा प्रत्येक मानवास अधिकार आहे. यातूनच सर्वांना मुक्त हालचालीचे स्वातंत्र्य, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक शिक्षणाचा अधिकार, विश्रांतीचा अधिकार, आरोग्य, अन्न, वस्त्र निवारा, वैद्यकिय सुविधा, सामाजिक सुविधा, सामाजिक सुरक्षितता

मिळण्याचा अधिकार प्रदान केलेले असतांना सुद्धा फक्त शासनकर्त्यांना याबाबत धोरणनिर्मिती व त्याच्या अंमलबजावणीतील जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे आजही स्त्रियांचे अनेक प्रश्न स्वातंत्र्याच्या सहादशकानंतरही भयावह स्वरुप धारण केलेले दिसुन येतात. त्यात स्त्री-भ्रुणहत्या, निरक्षरता, बालमजुरी, लौंगिक शोषण, हुंडाबळी, बालविवाह, स्त्रियांचा व्यापार इ.

मानवी जीवनातील विविध प्रश्नांचा विचार करणाऱ्या मानवी हक्कांच्या सनदेत ३० कलमांचा समावेश आहे. यात मानवी व्यापार आणि शरीरविक्री यांवर बंधन लादणारा करार, महिलांच्या राजकीय हक्काबाबतचा करार, विवाहाच्या समयी किमान वय, विवाह नोंदणी बाबतचा करार, महिलांबाबत होणाऱ्या पक्षपातांचे निर्मूलन करण्याचा करार, स्त्रियांना मानव अधिकार मिळालेला नाही हे वास्तव आहे. आज एकविसाव्या शतकातील समाज घडविण्यासाठी स्त्रियांना त्यांचे मानवी हक्क बहाल करणे आवश्यक आहे. त्यासाठी पुरुषी मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

### ❖ कुटूंब आणि स्त्री :-

समाजाच्या मानसिकतेबरोबर कौटुंबिक मानसिकता देखील महिलांच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत उपयुक्त आहे. याचे कारण म्हणजे मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेद व परस्परांमधील कर्तबगारीची मर्यादा यांची सीमारेषा आखून देण्याची प्रक्रिया घरातूनच होत असते.

स्त्रीला राजकीय स्थान मिळाले, पंचायत राज्यात सहभाग घेता आला. मात्र खरे चित्र पहाता सरपंच महिला असतात पण काम मात्र नवरा, किंवा मुलगा बघतो. दरमहिन्याला पगाराची रक्कम पती, सासु- सासरे यांच्याकडे निमुट देणाऱ्या महिलांची संख्या जरी दर्शविली जात नसली तरी खूप आहे.

महिला शिक्षण घेऊन कमावत्या होत आहेत. करियर करणाऱ्या महिला आर्थिक स्वावलंबन मिळवित असून पुरुषांच्या बरोबरीने कार्यप्रवणता, क्षमता व कौशल्य सिद्ध करीत आहेत. पण कमावतेपणा हा घरकामाचा भार कमी करणारा हमखास मार्ग अनेकजणींच्या वाट्याला येत नाही. उलट त्यांच्याकडून अपेक्षा उंचावल्याने घराबाहेरचीही काम अंगावर पडत आहेत. बालसंगोपन, किचन व्यवस्था, आल्या गेल्यची ऊठबैस, पै - पाहूणे, आजारी, वडिलधाऱ्यांची काळजी व मुलांची देखभाल अशासारख्या जबाबदाऱ्या या महिलांच्याच अशा अपेक्षा घर व इतर मंडळीच्याही सण, व्रत वैकल्य करण्याबद्दलची नकळत सजेशन व करणं भाग पाडणं कुटुंबकर्ती म्हणून मार्केटिंगसह सगळं सोपविण्याने महिला शारीरिक व मानसिक थकवा समस्येला सामोरे जात आहेत.

चूल व मूल हे कार्यक्षेत्र पार करुन महिला विविध क्षेत्रात पदार्पण करीत आहेत. महिला घराबाहेर कर्तुत्व व क्षमता दाखवून अर्थार्जन करीत आहेत. त्यामुळे घरकामात आता पुरुषांनी हातभार लावावा असा त्यांचा आग्रह असतो. मात्र पुरुष हे महिलांना, 'मिळवती मग तोरा मिरवणार' असे म्हणत मानसिक टोचणी, अवहेलना, उपहासात्मक वक्तव्ये

करीत राहतात. दुसरं म्हणजे पुरुष आता घरकामात मदत करीत असले तरी त्यामागे उपकार कर्त्याची भावना असते व त्यात लहरीनुसार सवड सापडेल तर ते करण्याची भूमिका असते. त्यातुनच महिलांना मनस्ताप, संताप होतो, ताण-तणाव वाढतो.

कार्यालयीन कामकाजातून येणारा ताण हा सुद्धा महिला समर्थपणे घेत असल्या तरी घर हे वाट पाहात असतेच करियरमधील ताण तणावास सामोरे जाण्यासाठी घर हा आधार, पतीशी संवादी नाते, मुलांचा समजुन घेण्याचा स्वभाव व कुटुंबियांचे सहकार्य हे तर टेन्शन रिलिव्हर ठरणारे मात्र अशी अनुकूलता फार कमी महिलांना लाभते. घर व करियरचा दुहेरी ताण हा वेळ स्वतःसाठी कसा पुरवून उरवून घ्यायचा या समस्येने बहुसंख्य महिलांना घेरले आहे.

महिलांसाठी अनेक आव्हाने उभी असली तरी त्या अनेक क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध करीत आहेत. गतिमान जीवन, आधुनिक लाईफ स्टाईल, उंचावलेल्या अपेक्षा आणि स्वतःच्या महत्वकांक्षा या सर्व आघाड्यांवर पूर्ण ताकदीनिशी समर्थपणे सामोऱ्या जात आहेत. तरीही स्त्रियांना एक आदरयुक्त दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आहे. स्त्रियांच्या दर्जात सुधारणा करणारे कायदे व उपक्रम तेव्हाच महत्वाचे ठरतील जेव्हा स्त्रियांच्या प्रति असणारा दृष्टीकोन बदलेल.

**निष्कर्ष :**

१) स्त्री - पुरुष यांना समान अधिकार कायद्याने दिलेले आहेत. परंतु तत्वतः कायद्याने मान्यता मिळून चालणार नाही तर समाजाने प्रत्यक्ष तशी वागणूक दिली पाहिजे.

२) स्त्रियांना स्वतंत्रपणे कार्य करु दिले तरच स्त्रीयांना खऱ्या अर्थाने सबल बनविता येईल.

३) आई म्हणून समाज निर्माण करणारी नीतीमूल्य जतन करुन ठेवणारी शक्ती म्हणून महिलांकडे बघितले पाहिजे.

४) स्त्रीयांनी आपल्या गुणवत्तेवर पुढे यावे यासाठी कुटुंब व समाजाकडून प्रोत्साहन मिळावे.

५) स्त्रीयांमध्ये विकासासाठी जाणीव असली पाहिजे, ह्यासाठी स्त्रीने बदललेल्या जीवनादृष्टीकडे मोकळ्या मनाने पाहिले पाहिजे.

६) हतबल झालेल्या स्त्रियांच्या पिळवणूकी विरुद्ध अत्याचाविरुद्ध फक्त कायदे न करता शिक्षण, आरोग्य व रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

७) स्त्रीयांना आपल्या अधिकार कक्षाची ओळख व्हावी मानव अधिकार व्यक्ती विकासाला पुरक आहेत. ही जाणीव प्रत्येक महिलेला व्हावी व प्रत्येक महिलेने हा माझा हक्क आहे व तो मी मिळविणारच असा निर्धार करावा.

८) मुलगा व मुलगी दोघांनाही घरातील कामांमध्ये सहभागी होण्याचे वळण कुटुंबात लावावे, तरच मुल 'स्त्री-पुरुष समानतेकडे ' समतोलपणे पाहू शकतील.

असह्य वेदना सहन करुन मनुष्याला निर्माण करण्याची शक्ती ज्या स्त्री जातील परमेश्वराने दिली आहे याहून धैर्याची प्रेमपूरक वात्सल्याची अधिक कठीण कसोठी क्वचितच पाहावयाला मिळेल. जोपर्यंत समाजात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळत नाही व मुलीचा जन्म ही पुत्र जन्माइतकाच आनंदाचा मानला जात नाही तो पर्यंत मानवी हक्कांच्या वल्गना व्यर्थ आहेत.

**संदर्भ सूची**

१) डॉ. लीला पाटील, ***महिलांसमोरील नवी आव्हाने,*** ऑक्टोबर २००८ योजना मासिक, संपादक नीतीन केळकर.
२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व गटशिक्षण परिषद पूणे -३० मूलींचे शिक्षण सर्वशिक्षा अभियान
३) प्रा. पाटील व्ही.बी.,***मानवी हक्क***, के सागर पब्लिकेशन्स पुणे.